**कलम ८२ अन्वये सहकारी संस्थांचे दोषदुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेणेबाबत.....**

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे**
**नविन मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे कार्यालय**
**जाक्र.सआ/लेखापरीक्षण/दोषदुरुस्तीअह./२०८९/२०१७,दि. ११/०८/२०१७**

**-: परिपत्रक :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८२ अन्वये लेखापरीक्षण अहवालातील दोषांच्या दुरुस्तीची तरतुद आहे. राज्यातील एकुण संस्थेच्या प्रमाणात दोष दुरुस्ती अहवाल प्राप्ती व त्यावरील पुढील कार्यवाही अल्प प्रमाणात होतांना दिसुन येते. लेखापरीक्षण अहवालातील दोष पुर्तता वेळचेवेळी न झाल्याने त्याच त्या दोषांची वारंवारीता पुढील आर्थिक वर्षामधे कायम राहते आहे. ही बाब संस्थेच्या व सभासदांच्या आर्थिक, सामाजीक हितास बाधा पोहचवणारी आहे. पुढे जावून दोषांच्या पुनरावृत्तीमुळे याच संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत होतांना दिसुन येतात. कलम ८२ अधिन लेखापरीक्षण अहवालामधील दोषांच्या दुरुस्तीवर वेळीच लक्ष देणे आवश्यक झालेले आहे.

कलम ८२ व नियम ७३ अन्वये सहकारी संस्थेच्या लेखापरिक्षण अहवालावरुन त्यांचे कामकाजात कोणतेही दोष असल्याचे उघडकीस आले नंतर संस्थेने, लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन तीन महिन्याचे आत लेखापरिक्षकांनी निदर्शनास आणलेले दोष किंवा नियमाबाह्यता दूर करण्यासाठी उपाय योजना करुन तसा अहवाल अधिनियमात विहीत केलेल्या "ओ" नमुन्यामध्ये **वस्तुनिष्ठ स्पष्टीकरणांसह** संबंधीत लेखापरीक्षकास सादर केला पाहिजे. "ओ" नमुन्यातील दोष दुरुस्ती अहवाल प्राप्तीअंती लेखापरीक्षकांनी त्यावर आपले बाबनिहाय अभिप्राय, दोषांच्या प्रत्यक्ष पुर्तता/अपुर्ततेस अनुसरुन नोंदवून हा अहवाल संबंधीत निबंधकास सादर करावा. उपरोल्लेखीत प्रकीयेद्वारे दोषांच्या स्पष्टीकरणांसह संस्थां स्तरावरुन तयार केलेला दोष दुरुस्ती अहवाल लेखापरीक्षकाच्या अभिप्रायासह संबंधीत निबंधकास तीन महिन्याच्या आत सादर होईल अशी दक्षता घेणे अनिवार्य आहे.

संस्था दोषांची संपुर्ण दुरुस्ती करेपर्यंत, संस्थेने सादर केलेल्या"ओ" नमुन्यातील दोष दुरुस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाला सदरहु अहवाल सादर करणे ही संबंधीत लेखापरीक्षकाची जबाबदारी आहे.

लेखापरीक्षण अहवालाद्वारे उघडकीस आलेले दोष दुरुस्त करण्यास किंवा निबंधकाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे दोष दुरुस्त करण्यात संस्थेने कसुर केला तर कलम ८७ (४) अन्वये संबंधीत निबंधक असे दोष दुरुस्त करवुन घेण्यासाठी उपाय योजना करेल आणि त्याच्यामध्ये ज्या जबाबदार व्यक्तींनी / अधिका-यांनी असे दोष दुरुस्त करणेसाठी कसुर केला आहे, अशा संस्थेच्या एक किंवा अनेक अधिका-यांकडून प्रस्तुत उपाय योजनेसाठी झालेला खर्च वसुल करेल.

संस्थेचे संबंधीत अधिकारी व पदाधिकारी यांनी, त्यांचे संस्थेच्या मागील वित्तिय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे कलम ७५ (२) व कलम ७५ (४)अन्वये जर सादर केला नाही तर संस्थेच्या ज्या अधिका-यांनी किंवा समिती सदस्यांनी सदरहु उपबंधाचे पालन न करता आपले कर्तव्य बजावतांना कसुर केला आहे त्यासाठी कलम ७५ (५) अन्वये ते अधिकारी किंवा समिती सदस्य, संस्थेचा पदाधिकारी म्हणून किंवा समितीचा सदस्य म्हणून कामकाज करण्यास आणि समितीचा सदस्य म्हणुन निवडला जाण्यास महत्तम ५ वर्षापर्यंत अनर्ह राहील अशी तरतुद आहे. शिवाय याच तरतुदी अन्वये जो अधिकारी संस्थेचा कर्मचारी आहे. त्याने प्रस्तुत उपबंधाचे अनुपालन

करण्यास कसुर केल्याची बाब निदर्शनास आल्यास ५०००/- रुपयांपर्यंत दंड भरण्याबाबत देखील तरतुद आहे. सदरहु तरतुदीची अधिनियमास अभिप्रेत प्रभावी अंमलबजावणी करुन दोष दुरुस्ती अहवाल वार्षिक साधारण सभे पुढे ठेवणेस कसुर करणा-या पदनिर्देशीत पदाधिकारी, संचालक सदस्य व अधिकारी यांचेवर नैसर्गीक न्यायाने उचित संधी देवून पुढील कारवाई करावी.

ज्या संस्था दोष दुरुस्ती अहवाल तयार करुन सादर करणार नाहीत. अशा संस्थांच्या सर्व समिती सदस्यांनी कलम १४६ (ल-१) अन्वये अपराध केला असल्याचे मानून ते कलम १४७ (ल-१) मधे तरतुद केल्याप्रमाणे शास्तीस पात्र राहतील. याप्रमाणे संबंधीत निबंधक कलम १४६,१४७ व १४८ अन्वये पुढील कायदेशीर कार्यवाही पार पाडतील.

ज्या सहकारी संस्था त्यांचे वैधानिक लेखापरीक्षणाअंती लेखापरीक्षा अहवालाद्वारे निदर्शनास आणुन दिलेल्या दोषांच्या दुरुस्तीसाठी कलम ८२ अन्वये दोष दुरुस्ती अहवाल सादर करण्यास प्रतिसाद देणार नाहीत. त्यांचेवर वरीलप्रमाणे अधोरेखित केलेनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८७(४),कलम ७५(५) व कलम १४६,१४७ व १४८ अन्वये पुढील कार्यवाही करुन लेखापरिक्षीत सर्व संस्थांचे दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घ्यावेत. याबाबतची संकलीत माहिती प्रतिमाह ०५ तारखेपर्यंत सोबतच्या प्रपत्र 'अ' व 'ब' मध्ये या कार्यालयास नियमितपणे सादर होईल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

(डॉ.विजय झाडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव - :

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण)सर्व
२) सहनिबंधक, सहकारी संस्था,(दुग्ध)मुंबई
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (सर्व)
५) उपनिबंधक, सहकारी संस्था,(मत्सय)मुंबई
६) पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
८) संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी, मुंबई.
१०) मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापुरवाला मत्सालय, मरीन लाईन, मुंबई.
११) अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) अपर निबंधक (वसुली व नियोजन) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) अपर निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) अपर निबंधक (तपासणी व निवडणुका ) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) अपर निबंधक (लेखापरिक्षण) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) अपर निबंधक (आदिवासी विकास) सहकारी संस्था, नाशिक
१७) मा.सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय पुणे.

परिपत्रक:- कलम ८२ अन्वये सहकारी संस्थांचे दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेणेबाबत केलेली कार्यवाही

## प्रपत्र अ

| जिल्हा/ विभाग | सन २०१५-१६ अखेरील लेखापरीक्षण पूर्ण संस्था | सन २०१६-१७ अखेरील लेखापरीक्षण पूर्ण संस्था | एकूण (२+३) | दोष दुरूस्ती अहवाल तयार करून संबंधित लेखापरीक्षकाकडे | | | | | | संबंधित लेखापरीक्षकाने दोष दुरूस्ती अहवालावर अभिप्राय नोंदवून निबंधकांकडे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सादर केलेल्या संस्थांची संख्या | | | सादर न केलेल्या संस्थांची संख्या | | | सादर केलेल्या संस्थांची संख्या | | सादर न केलेल्या शिल्लक संस्थांची संख्या | |
| | | | | सन २०१५-१६ अखेरील लेखापरीक्षण पूर्ण संस्थापैकी | सन २०१६-१७ अखेरील लेखापरीक्षण पूर्ण संस्थांपैकी | एकूण (५+६) | सन २०१५-१६ अखेरील लेखापरीक्षण पूर्ण संस्थांपैकी शिल्लक (२-५) | सन २०१६-१७ अखेरील लेखापरीक्षण पूर्ण संस्थांपैकी शिल्लक (३-६) | एकूण (८+९) | सन २०१५-१६ अखेर (रकाना क्र.५ पैकी) | सन २०१६-१७ अखेर (रकाना क्र.६ पैकी) | सन २०१५-१६अखेर (५-११) | सन २०१६-१७ अखेर (६-१२) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |

## परिपत्रक :- कलम ८२ अन्वये सहकारी संस्थांचे दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेणेबाबत केलेली कार्यवाही

### प्रपत्र ब

<table>
<tr><th rowspan="3">जिल्हा / विभाग</th><th colspan="2">संबंधित लेखापरीक्षकाने दोष दुरूस्ती अहवालावर अभिप्राय नोंदवून निबंधकांकडे सादर केलेल्या संस्थांची संख्या (प्रपत्र अ मधील रकाना क्रमांक ११ व १२)</th><th colspan="2">संबंधीत निबंधकाने कलम ८२ अन्वये संस्थेच्या कामकाजातील दोष व नियमबाह्यतेची पुर्तता मान्य केलेल्या संस्थांची संख्या (निर्देश देणे आवश्यक नसलेल्या संस्था)</th><th colspan="4">संबंधित निबंधकाने कलम ८२ अन्वये दोष दुरूस्ती अहवालामधील पूर्तता न केलेल्या दोषाबाबत</th><th colspan="2">कलम ८७ (४) प्रमाणे कार्यवाही केलेल्या संस्थांची संख्या</th><th colspan="8">कलम ८२ अन्वयेचा दोष दुरूस्ती अहवाल संबंधित निबंधकांकडे सादर न केलेल्या संस्थांविरुद्ध केलेली कारवाई</th></tr>
<tr><th rowspan="2">सन २०१५-१६ पैकी</th><th rowspan="2">सन २०१६-१७ पैकी</th><th rowspan="2">सन २०१५-१६ पैकी</th><th rowspan="2">सन २०१६-१७ पैकी</th><th colspan="2">निर्देश दिलेल्या संस्थांची संख्या</th><th colspan="2">निर्देश न दिलेल्या संस्थांची संख्या</th><th rowspan="2">सन २०१५-१६ पैकी</th><th rowspan="2">सन २०१६-१७ पैकी</th><th colspan="2">अधिनियमातील कलम १४६ अंतर्गत अपराधाखाली कारवाई केलेल्या संस्थांची संख्या</th><th colspan="2">अधिनियमातील कलम १४७ अंतर्गत कलम १४८ अन्वये शास्ती केलेल्या संस्थांची संख्या</th><th colspan="2">दोष दुरूस्ती अहवाल अद्याप सादर केलेला नसतांनाही निबंधकाने कारवाई न केलेल्या शिल्लक संस्था संख्या</th><th colspan="2">अधिनियमातील कलम ७५(५)अंतर्गत कारवाई केलेल्या संस्थांची संख्या</th></tr>
<tr><th>सन २०१५-१६ पैकी</th><th>सन २०१६-१७ पैकी</th><th>सन २०१५-१६ पैकी</th><th>सन २०१६-१७ पैकी</th><th>सन २०१५-१६ पैकी</th><th>सन २०१५-१६ पैकी</th><th>सन २०१६-१७ पैकी</th><th>सन २०१५ - १६ पैकी</th><th>सन २०१६-१७ पैकी</th><th>सन २०१६-१७ पैकी</th><th>सन २०१६-१७ पैकी</th><th>सन २०१६-१७ पैकी</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td><td>७</td><td>८</td><td>९</td><td>१०</td><td>११</td><td>१२</td><td>१३</td><td>१४</td><td>१५</td><td>१६</td><td>१७</td><td>१८</td><td>१९</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>